# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

१४ एप्रिल, २०२०



☎ : 07172-264300

: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


## बाहेर जिल्हयातुन आलेल्यांवर चिमुर पोलीसांची कार्यवाही

कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषीत केला असुन कोरोना विषाणुचा प्रसार संपुर्ण महाराष्ट्रात गतीने पसरत असल्याने चंद्रपूर जिल्हयात एकही कोरोना (Covid-19) विषाणचा रूग्ण नाही. त्याअनुषंगाने चंद्रपुर पोलीस दलातर्फे बाहेर राज्य अथवा जिल्हयातुन येणाऱ्यांवर प्रभाविपणे कार्यवाही करण्यात येत आहे.

दिनांक ११/०४/२०२० रोजी दुपारी २:०० वा. सुमारास चिमुर पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, चार महिला वाहनाने नागपुरवरून शासनाकडुन कोणतीही लेखी पुर्व परवाणगी न घेता चंद्रपुर जिल्हयात आल्याची माहिती मिळाली. त्यावरून चिमुर पोलीसांनी बातमीप्रमाणे लागलीच चिमुर येथुन एका माहिलेला ताब्यात घेतले. तिचे कडुन माहिती घेतली असता, त्यामहिलेसोबत आणखी तिन महिला नागपूर वरून कोणतीही परवानगी न घेता चंद्रपुर जिल्हयात बेकायदेशीररित्या प्रवेश केल्याने त्यांचेवर चिमुर पोलसांनी कलम १८८, २६९, २७० भादंवि सहकलम महाराष्ट्र पोलीस कायदा १३५, संसर्गजन्य रोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम ३ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१(बी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ. महेश्वर रेडड्री यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक चिमुर श्री. स्वप्नील धुळे व त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी केली.

## आवाहन

**‘‘पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ. महेश्वर रेडड्री यांनी सर्व जनतेला आवाहन केलेले आहे की, बाहेर राज्य अथवा बाहेर जिल्हयातुन कोणीही बेकायदेशीर रित्या किंवा शासनाची कोणतीही लेखी परवाणगी घेतल्याशिवाय चंद्रपुर जिल्हयात प्रवेश करू शकणार नाही. जर अशा प्रकारे कोणी प्रवेश करतांना मिळुन आल्यास त्यावर विविध कलमांन्वये कठोर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.’’**

---